प्रेसनोट दि. १८/०८/२०१८

नवनाथ लोधा टोळीच्या गुन्हेगारास अटक करुन, ०१ गावठी पिस्टल, ०३ काडतुसे गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक पथकाकडून जप्त

oooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooo

पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार मंगेश बाळासाहेब तांबे हा दि.१७/०८/२०१८ रोजी १७.०० वा. चे सुमारास गावठी बनावटीचे पिस्टल घेवुन ससुन हॉस्पिटलचे मेनगेट समोर सार्वजनिक रोडवर पुणे येथे येणार आहे. अशी खात्रीशीर बातमी दरोडा प्रतिबंधक पथकातील पोलीस नाईक विल्सन संतान डिसोझा यांना मिळाली असता, त्यांनी सदर माहिती दरोडा प्रतिबंधक पथकाचे प्रमुख श्री राजेंद्र कदम पोलीस निरीक्षक यांना कळविली असता त्यांनी तात्काळ सदर ठिकाणी छापा टाकून कारवाई करणेचे आदेश दिल्याने दरोडा पथकातील कर्मचा-यांनी बातमीच्या अनुषंगाने खात्री करुन शोध घेतला असता पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार मंगेश बाळासाहेब तांबे हा ससुन हॉस्पिटलचे मेनगेट समोर सार्वजनिक रोडचे फुटपाथवर पुणे येथे संशयास्पदरित्या उभा असल्याचे निर्दशनास आल्याने त्यास अचानक छापा टाकून १७.०० वा.पकडले.

मंगेश बाळासाहेब तांबे याची झडती घेतली असता त्याचे कंबरेस डावे बाजूस खोसलेले एक लोखंडी धातूचे गावठी बनावटीचे पिस्टल मॅगझीनसह तसेच त्याचे नेसते पँटचे खिशात ३ राऊंड कागदात गुंडाळुन ठेवलेले असा सर्व मिळून ३५,६००/-रु. किंमतीचे अवैध शस्त्र व काडतुसे मिळून आलेली आहेत. मंगेश तांबे याने अजय शिंदे याचेवर गोळीबार केलेबाबत त्याचेविरुध्द खडक पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. ६६/२०१५ भा.द.वि.क. ३०७, १२०(ब), १४३, १४७, १४८, १४९, ३४ आर्म ॲक्ट कलम ३, ४ (२५) व मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७(१) सह १३५ तसेच मोका ॲक्ट कलम ३(१)(ब), ३(२) ३(४) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त श्री प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त श्री शिरीष सरदेशपांडे, मा. सपोआ गुन्हे-१, श्री समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे दरोडा प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, सहा.फौजदार संजय दळवी, यशवंत आंब्रे, पो. हवा. ३२७९ अजय थोरात, पो. ना. ६६१३ विल्सन डिसोझा, पो. ना. ५७७ अमोल पवार, यांनी केली आहे.